॥ काळ्या मातीत मातीत ॥

काळ्या मातीत मातीत तिफन चालते
वीज थयथय नाचते ढग ढोल वाजवितो ॥ धृ. ॥

सदाशिव हाकारितो नंदीबैलाच्या जोडीला
संग पारबति चाले ओटी बंधून पोटाला।
सरीवर सरी येती माती न्हातीधुती होते
कस्तूरीच्या सुवासाने भूल जीवाला पडते।
भूल जीवाला पडते वाट राघूची पाहते
राघू तिफन हानतो मैना वाटुली पाहते ॥ १ ॥

सर्जा रं माझ्या ढवळ्या रं माझ्या पवळ्या रं माझ्या आहा!

झोली झाडाला टांगून राब राबते माउली
तिथं झोलीतल्या जीवावर पारखी साउली।
अभिषेकात घामाच्या आज देवाचं पूजन
पिकं हालती डोलती जनू करती भजन।
गव्हा जोंधळ्यात या सोनं चांदी लकाकती
जशी चांदी लकाकते, कपाशी फुलते ॥ २ ॥

सालं ऊनपावसाचा पाठशिवणिचा खेळ
लोनी पायाला वाटती मऊ भिजली ढेकळं।
काळ्या ढेकळात डोळा हिरवं सपान पाहतो
डोळा सपान पाहतो काटा पायात रुततो।
काटा पायात रुतता, लाल रगात सांडतं
लाल रगात सांडतं हिरवं सपान फुलतं ॥ ३ ॥